FORM - 1A

N.C.R.B.

I.I.F.-06

# पहिली खबर

## FIRST INFORMATION REPORT

फौजदारी प्रकिया संहितेच्या कलम १५४ अन्वये (Under Section 154 Cr. P.C.)

1. राज्य State महाराष्ट्र जिल्हा District मुंबई पोलीस ठाणे Police Station ला.प्र.वि. मुंबई विभाग पहिली खबर क्र. FIR No. ३२/१८ वर्ष, Year २०१८ दिनांक Date ०२/१०/२०१८

2. (i) अधिनियम Act भ्र. प्र. अधिनियम (सुधारित) २०१८ कलमे Sections ७, ७(अ) सह १२
   (ii) अधिनियम Act ............ कलमे Sections ............
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ............

3. (a) अपराधाची घटना : वार Occurence of offence : Day ............ तारीख पासून Date from १८/०८/१८ वेळ Time ............ तारीख पर्यंत Date to ०२/१०/१८ वेळ Time १८.००

3. वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी अशी खूण करा. Tick applicable portion)
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (10) 18.00 ते 06.00

   (b) पो. ठा. ला माहिती मिळालेची Information received at P. S. तारीख Date २८/०९/१८ वेळ Time १४.३० वा

   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. १८ तारीख Date ०२/१०/२०१८ वेळ Time ............

4. माहितीचा प्रकार Type of information : लेखी / तोंडी Written / Oral लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा ............ चौकी/बीट/दूरक्षेत्र नाव व क्र. ............
   Place of Occurence : (a) Direction and distance from P.S. Chouki/Beat/O.P. Name and No.

   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurence Name अवयव प्रत्यारोपण विभाग, पहिला माळा सर जे.जे. समूह रुग्णालय मुंबई ८ ठिकाणाचे नंबर No. if any गल्ली Ward रस्त्याचे नाव Name of road

   जवळचे ओळख चिन्ह/ठिकाण Nearest Adentifiable Place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो. स्टे. चे नाव In case, outside the limit of this Police Station ............ तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant/Informant : Permanent Address

   (a) नाव Name मोहमंद जिया (b) वडिलाचे / पतीचे नाव Father's / Husbands Name मोहमंद यहिया सिद्दिकी

   (c) जन्मतारीख व वय Date of Birth & Age २८ वर्षे (d) राष्ट्रीयत्व Nationality भारतीय फोन नं. Phone No. ............

   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ............ दिल्याचा दिनांक Date of Issue ............ दिल्याचे ठिकाण Place of Issue ............ (f) व्यवसाय Occupation ............

   (g) धर्म Religion ............ जात Caste ............ जनजात Sub-Caste ............

   (h) पत्ता : गल्ली/सर्व्हे नं. Address : Ward खोली क्र. १०२, रामदेव बिल्डींग जेट नं ०८ म्हाडा मालवणी मालाड (प.) मुंबई ६४ घर/गाव नंबर House/Name No. फोन/मो. नंबर Phone/M. No. ............ पॅन नं. Pan No. ............ ओटर्स नं. Card No. ............

   रस्त्याचे नाव Road ............ जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ............ गाव Village ............ पोस्ट Post ............ पो.स्टे P. Stn. ............

   तालुका Taluka ............ जिल्हा Dist. ............ राज्य State ............ सध्याचा पत्ता Present Address ............

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म I B वर वेगळ्या सिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व स. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे).
   Details Name & Address of known Accused (Attach separate sheet, if necessary) (If suspect particular of physical feature write on Form I-B of attach FIR I-B to case diary).

   ① तुषार जयराम सावरकर वय ३४ वर्षे, समाजसेवा अधिक्षक, महाराष्ट्र शासन, सर जे.जे. समूह रुग्णालय, मुंबई

   ② सचिन शंकर साळवे वय ३२ वर्षे अवयव प्रत्यारोपण समन्वयक

   [illegible] डॉ. बी.ए. रोड परेल मुंबई १२

896

8. तक्रारदाराने/फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे ...... लागलीच
Records for delay in reporting by the Complainant/informant

9. चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तार मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proform) write down details on blank back page.

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य ...... रु. ८०,०००/-
Total value of properties stolen and involved

(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recover Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक ......
Unnatural/Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

बाजूस नमूद तारीख वेळी व ठिकाणी फिर्यादी यांच्या पित्याच्या किडनी ट्रान्सप्लांटकरिता आवश्यक असलेल्या परवानगीकरिता यातील आरोपी तुषार सावरकर यांनी [illegible] हॉस्पिटल मधील येथील अवयव प्रत्यारोपण समन्वयक खाजगी इसम सचिन साळवे यांचे मार्फतीने कायदेशीर पारिश्रमिकाशिवाय रुपये १,५०,०००/- ची मागणी करून तडजोडीअंती रु ८०,०००/- ची लाच खाजगी इसम आरोपी सचिन साळवे यांनी सर जे.जे. हॉस्पिटल येथील अवयव प्रत्यारोपण विभाग येथे स्विकारून लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडले म्हणून गुन्हा कलम ७, ७(अ) सह १२ भ्र. प्र. अधिनियम (सुधारित) २०१८ अन्वये दाखल

13. **केलेली कार्यवाही** — 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला. तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा ...... पो.नि. संजय शिंदे

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण. ......

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन ...... जिल्हा ...... राज्य ......

*Action taken* .— Since the above information reveals Commission of offence (s) u/s. as mentioned at Item No. 2 :
(1) Registered case and took up the investigation or Directed (Name of I. O.) ...... Rank ...... No. ...... to take up the Investigation or
(2) Refused Investigation due to ...... (3) Transferred to P. S. ...... District ...... on point of jurisdiction.

तकारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद बरोबर लिहिली असल्याचे पाहून/वाचून/ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant/Informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/informant, free of cost.

(R.O.A.C.)

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer Incharge, Police Station.
संपूर्ण नाव Name ...... संजय शिंदे
पदनाम Rank ......
तपासिक अं. चा कोड क्र. पोलीस निरीक्षक
Posting
Coding No. of I. O. ......

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant/Informant

15. १. न्यायालयात सादर केल्याची तारीख ......
1. Date and time of submitted to the Court

प्रत. 2. फिर्यादी, 3. पोलीस अधीक्षक (संगणक), 4. तपासिक अमलदार, 5. स्थळ प्रत.
Copy to, 2. Complainant, 3. Supdt. of Police (Computer), 4. Inv. Officer, 5. Office Copy.

फिर्याद दिनांक– ०१/१०/२०१८.

श्री. मोहम्मद जिया मो. याहीया सिध्दिकी, वय–२८ वर्षे, व्यवसाय – मेडीकल विद्यार्थी रा.ठि – रू.नं.१०२, प्लॉट नं. ३१, मालवणी रामदेव बिल्डिंग, म्हाडा, मालवणी गेट न. ८, मालाड (प), मुंबई ४०० ०९५, मो.क्र. ७७१०९७७०२२

..........

मी वरीलप्रमाणे असून जन्मापासुन माझ्या कुटूंबासमवेत वरील पत्त्यावर राहावयास आहे. सध्या डॉ. जे.जे. मकदुम, होमीओपॅथीक मेडीकल कॉलेज, कोल्हापुर येथे मेडीकल विदयार्थी म्हणुन शिकत आहे. मी मुंबई येथे आलो असता माझ्या परिसरात राहणारा माझा मित्र जमालउद्दीन खान आजारी असल्याचे मला कळले. मी त्याला भेटायला त्याच्या घरी गेलो तेव्हा मला कळले की, जमालउददीन याच्या दोन्ही किडनी निकामी झाल्या असून त्यांच्या मेव्हण्याची पत्नी श्रीमती मैरून निशा शेख यांनी स्वतःची एक किडनी देण्याची तयारी दर्शविली आहे. तसेच जमालउद्दीन याचे किडणीचे ऑपरेशन रहेजा रूग्णालय येथे होणार असून त्याचे किडनीचे ऑपरेशन करण्याकरीता एस.एल.रहेजा रूग्णालय यांच्या मार्फतीने जे.जे. रूग्णालय येथे ऑर्गन ट्रान्सप्लांट कमिटी च्या परवानगी करीता फाईल पाठविण्यात आलेली होती.

एस.एल रहेजा रूग्णालयामधील ऑर्गन ट्रान्सप्लांट कोर्डिनेटर, श्री.सचिन साळवे यांच्या मार्फतीने माझा मित्र श्री जमालउद्दीन खान यांच्या किडनी ट्रान्सप्लांट करण्याकरीता आवश्यक असलेली परवानगी घेण्याकरीता फाईल जे.जे. रूग्णालयामधील ऑर्गन ट्रान्सप्लांट कमिटीकडे सादर केली होती. जे.जे. रूग्णालयातील ऑर्गन ट्रान्सप्लांट कोऑर्डीनेटर श्री. तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक, महाराष्ट्र शासन, यांना सदरची फाईल मंजूर करण्याकरीता लाचेच्या स्वरूपात रू.१,५०,०००/– इतकी रक्कम दयावी लागेल असे श्री.सचिन साळवे, एस.एल.रहेजा रूग्णालय. ऑर्गन ट्रान्सप्लांट कोर्डिनेटर, यांनी मला सांगितले,

सदर कामाकरीता लोकसेवक यांना कोणत्याही प्रकारे लाच देण्याची इच्छा नसल्याने मी दि.२८/०९/२०१८ रोजी ला.प्र.वि. मुंबई येथे लोकसेवक याचेविरूध्द तक्रार देण्यासाठी गेलो. सदर विभागातील पोलीस निरीक्षक श्री. संजय शिंदे यांनी माझ्या तक्रारीची दखल घेवून माझे स्वहस्ताक्षरामध्ये माझी तक्रार लिहून घेतली. त्यानंतर पो.नि शिंदे यांनी दिलेल्या सुचनेप्रमाणे आम्ही दि.२८/०९/२०१८ रोजी जे. जे. रूग्णालय येथे लोकसेवक ऑर्गन ट्रान्सप्लांट कोऑर्डीनेटर श्री. तुषार सावरकर यांचे कार्यालयात जावून दोन शासकीय पंचासमक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान लोकसेवक ऑर्गन ट्रान्सप्लांट कोऑर्डीनेटर श्री. तुषार सावरकर यांनी माझ्याशी प्रत्यक्ष लाचेची मागणी न करता एस.एल.रहेजा रूग्णालयातील ऑर्गन ट्रान्सप्लांट कोऑर्डीनेटर श्री.सचिन साळवे यांचेशी बोलणी करण्याबाबत सांगितले. त्यानंतर ला.प्र.वि., मुंबई कार्यालयात परत येवून दि.२८/०९/२०१८ रोजी सविस्तर पडताळणी पंचनामा करण्यात आला आहे.

पो.नि. संजय शिंदे यांनी दिलेल्या सूचनेप्रमाणे दि.२९/०९/२०१८ रोजी खाजगी इसम श्री.सचिन साळवे, ऑर्गन ट्रान्सप्लांट कोऑर्डीनेटर, एस.एल.रहेजा रूग्णालय, माहिम येथे पंचासमक्ष जावून प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. पडताळणी दरम्यान श्री. सचिन साळवे, ऑर्गन ट्रान्सप्लांट कोऑर्डीनेटर, एस.एल.रहेजा रूग्णालय यांनी जमालउद्दीन याचे किडनी ट्रान्सप्लांट करण्याच्या परवानगीकरीता जे.जे. रूग्णालयातील ऑर्गन ट्रान्सप्लांट को–ऑर्डीनेटर श्री. तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक, यांना लाच स्वरूपात रू.१,५०,०००/– इतकी रक्कम दयावी लागेल असे मला सांगितले. त्यावेळी मी श्री. सचिन साळवे यांना रू.१,५०,०००/– इतकी लाचेची रक्कम देण्याची जमालउद्दीन यांची आर्थिक परिस्थिती नसल्याने लाचेची रक्कम कमी करण्याची विनंती केली असता तडजोडीअंती श्री. सचिन साळवे यांनी मला श्री. तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक, जे.जे. हॉस्पिटल, मुंबई याना रू.८०,०००/– इतकी लाचेची रक्कम दयावी लागेल असे पडताळणी दरम्यान सांगितले व जे.जे. हॉस्पिटल येथे दि. ०१/१०/२०१८ रोजी लाचेची रक्कम घेवून येण्यास सांगितले.

त्याप्रमाणे दिनांक ०१/१०/२०१८ रोजी मी मागणी केलेल्या लाचेची रक्कम रु.८०,०००/- स्वतःच्या बचतीतून उपलब्ध करुन ला.प्र.वि. कार्यालयात हजर झालो. त्यावेळी दोन्ही पंच असे ब्युरो कार्यालयात उपस्थित होते. त्यानंतर पो.नि. शिंदे यांनी ला.प्र.वि. कार्यालयात सापळापुर्व पंचनामा कारवाई पुर्ण करून सापळया करीता जे.जे. रूग्णालय, मुंबई येथे शासकिय वाहनाने पथकासह रवाना झालो. पो.नि. शिंदे यांनी माझे शर्टाचे आतील बनियनला व्हाईस रेकॉर्डर चालू करुन लावला व मला पंचासह लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता रवाना केले. सापळा दरम्यान सर जे.जे. समूह रूग्णालये, मुंबई, येथे श्री. सचिन साळवे आले असता मी त्यांना भेटलो. त्यांनी मला श्री. तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक, जे.जे. रूग्णालय, मुंबई यांच्या कार्यालयात घेवून गेले. तेथे श्री. तुषार सावरकर यांनी लाचेची मागणी करून त्यांच्या सांगण्यावरून रू.८०,०००/- इतकी लाचेची रक्कम श्री. सचिन साळवे यांच्या मार्फतीने स्विकारली. त्या दरम्यान सापळा पथकाने श्री.सचिन साळवे, ऑर्गन ट्रान्सप्लाट कोर्डिनेटर रहेजा रूग्णालय व श्री. तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक, जे.जे. रूग्णालय, मुंबई यांना त्यांच्या जे. जे. रूग्णालयातील कार्यालयात रंगेहाथ पकडून ताब्यात घेतले.

तरी दि.०१/१०/२०१८ रोजी लोकसेवक श्री. तुषार सावरकर, समाजसेवा अधिक्षक, जे.जे. रूग्णालय, व श्री. सचिन साळवे, ऑर्गन ट्रान्सप्लांट कोर्डिनेटर, रहेजा रूग्णालय यांनी जमालउद्दीन खान यांच्या किडनी ट्रान्सप्लांट करण्याकरीता जे.जे. रूग्णालय, ऑर्गन ट्रान्सप्लांट कमिटी यांची कायदेशीर परवानगी मिळणेकरीता रक्कम रू.१,५०,०००/- इतक्या लाचेची मागणी करून तडजोडीअंती रू ८०,०००/- इतक्या लाचेची रक्कम स्विकारली म्हणून माझी त्यांचेविरूध्द कायदेशिर तक्रार आहे.

माझा जबाब मराठीत संगणकावर टंकलिखित केला असून तो मी वाचून पाहिला असता माझे सांगणेप्रमाणे बरोबर आहे.

समक्ष

( संजय शिंदे )
पोलीस निरीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग,मुंबई.

यातील फिर्यादी नामे मोहमेद जिया मोहमेद यहिया सिद्दिकी वय २८ वर्षे याची स्वतंत्र पानावर टंकलिखित केलेली फिर्याद हीच गुन्ह्याची प्रथम खबर संबोधण्यात येत आहे. ती सोबत जोडण्यात आलेली आहे.

समक्ष

(संजय शिंदे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई